मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई या आस्थापनेवरील अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक : अस्थायी ०९१७/७५१/प्र.क्र.१९९/कार्यासन ११
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १२ ऑक्टोबर, २०१७.

पहा : १. शासन निर्णय वित्त विभाग क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१, वित्तीय सुधारणा, दि.१०/९/२००१.
२. शासन निर्णय क्र.अस्थायी १२१६/६४०/प्र.क्र.१८६/कार्यासन ११, दि.२७/३/२०१७.
३. शासन निर्णय वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आपुक, दि.३/१०/२०१७.
४. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांचे पत्र क्र. ३९६५ /२०१७, दि.२१/८/२०१७.

शासन निर्णय :

मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई या आस्थापनेवरील **३७४** अस्थायी पदांना संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये दि.१/३/२०१७ ते ३०/९/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई या आस्थापनेवरील पुढील तक्त्यात नमूद ३७४ अस्थायी पदांना या शासन निर्णयान्वये त्यापुढील म्हणजेच दि.१/१०/२०१७ ते ३१/१२/२०१७ पर्यंतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	अस्थायी पदांची संख्या
१	सहायक प्रबंधक	०२
२	सहायक अधीक्षक	०७
३	मुख्य लिपीक	०१
४	न्याय लिपीक	३६
५	दुभाषी	३६
६	स्वीय सहायक	०८
७	लघुलेखक (उ. श्रे.)	३०
८	लघुलेखक (नि. श्रे.)	१०
९	मुख्य रोखपाल	०३
१०	वरिष्ठ लिपिक	०३
११	मुख्य टंकलेखक	०१
१२	सहायक रोखपाल	१०
१३	लिपिक	०१
१४	टंकलेखक	३९

१५	लिपिक टंकलेखक	७३
१६	वाहन चालक	१२
१७	नाईक	०२
१८	शिपाई	५९
१९	हमाल	१४
२०	चपराशी	१०
२१	स्वच्छक	०२
२२	मेहतर	०१
२३	उद्वाहक	०१
२४	शिपाई (कंत्राटी पध्दतीने)	०३
२५	हमाल (कंत्राटी पध्दतीने)	०४
२६	चपराशी (कंत्राटी पध्दतीने)	०३
२७	सफाईगार (कंत्राटी पध्दतीने)	०३
	एकूण पदे	३७४

३. यासाठी होणारा खर्च मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई या कार्यालयासाठी मागणी क्र.जे-१, २०१४, न्यायदान, (००)१०७ इलाखा शहर दंडाधिकारी न्यायालये, (००), (००)(०१) इलाखा शहर दंडाधिकारी न्यायालये (अनिवार्य) (२०१४ ०२३४) ०१- वेतन या लेखाशीर्षाखाली सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/ आपुक्र, दि.०३/१०/२०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०१२१५५४०६२५१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Anita Dipak Ripote

Digitally signed by Anita Dipak Ripote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=28bdb8b03e204307a26238ccccb76a2c1eaa9ed4838f450b88dfb9ca9793b4b5, serialNumber=25e18795e96deb90b1428c41cb6c87bc90c3bb1f0ea059da3e0a07a3bc00c6c8, cn=Anita Dipak Ripote
Date: 2017.10.12 15:43:51 +05'30'

(अनिता रिपोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, :-

१) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.

२) प्रधान न्यायाधीश, मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई.

३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई,

४) महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.

५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

७) वित्त विभाग, व्यय ५/आ.पु.क.कक्ष/अर्थसंकल्प ११, मंत्रालय, मुंबई.

८) विधि व न्याय विभाग, कार्या २०/२३, मंत्रालय, मुंबई.

९) निवडनस्ती (कार्यासन ११).